05 JUL 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भावी पिढ्यांचे दिग्दर्शन ज्येष्ठांनी करावे

## काडसिद्धेश्वर स्वामी; शिवाजी विद्यापीठात 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ४ : ज्येष्ठत्व हे वयावर नव्हे, तर अनुभवावर अवलंबून असते. त्यामुळे आपले श्रेष्ठ वर्तन, आचार, राहणीमान याच गोष्टी आपल्याला अनुभवसमृद्ध बनवितात आणि हे श्रेष्ठत्व माणसाला ज्येष्ठपदी घेऊन जाते. भावी पिढ्यांचे दिग्दर्शन करणे ही या ज्येष्ठ पिढीने आपली जबाबदारी मानली पाहिजे. त्यासाठी आपले अचूक जीवनच आपल्या पुढील पिढ्यांसाठी आदर्श असावे, असे प्रतिपादन कणेरी (ता. करवीर) येथील सिद्धगिरी मठाचे अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी यांनी आज येथे केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' या पुस्तकाचे प्रकाशन सिद्धगिरी मठाचे अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते मंगळवारी झाले. यावेळी डावीकडून श्रीकांत आडिवरेकर, अण्णासाहेब गुरव, केदार मारुलकर उपस्थित होते.**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. अण्णासाहेब गुरव आणि श्रीकांत आडिवरेकर लिखित 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' या पुस्तकाचे प्रकाशनावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र अधिविभागातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते.

अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी आणि कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' या पुस्तकाचे आणि 'फेस्कॉम'च्या 'मनोहारी मनोयुवा' नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. श्रीकांत आडिवरेकर आणि डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. दीपा इंगवले, आदी उपस्थित होते. डॉ. केदार मारुलकर यांनी सूत्रसंचालन केले.

### 'स्वतःसाठीही जगायला शिका'

■ कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आयुष्यभर इतरांसाठी कष्टत असताना स्वतःच्या सुखी व निरोगी जीवनासाठी काही गोष्टी जाणीवपूर्वक केल्या पाहिजेत. तसे केल्यास अचानकपणे एके दिवशी ज्येष्ठत्वाच्या उंबरठ्यावर एकाकी वाटणार नाही किंवा ते असह्यही होणार नाही. थोडे आयुष्य स्वतःसाठीही जगायला शिकलेच पाहिजे. तरच आपण इतरांनाही तसे सहजसुंदर आयुष्य जगण्याची ऊर्जा देऊ शकतो.

पुण्यनगरी

# ज्येष्ठांनी नवी पिढी घडवण्यास मार्गदर्शन करावे

## काडसिद्धेश्वर स्वामी : विद्यापीठात 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या अनुभवाच्या आधारे सामाजिक कार्यामध्ये योगदान द्यावे, त्याचप्रमाणे नवी पिढी घडवण्यासाठीही मार्गदर्शन करावे, असे आवाहन कणेरी मठाचे मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. आण्णासाहेब गुरव आणि श्रीकांत आडिवरेकर यांनी लिहिलेल्या 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी काडसिद्धेश्वर स्वामी आणि कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते 'आनंदी श्रेष्ठत्व-ज्येष्ठत्व' या पुस्तकासह 'फेस्कॉम'च्या 'मनोहारी मनोयुवा' नियतकालिकाचेही प्रकाशन करण्यात आले. श्रीकांत आडिवरेकर आणि डॉ. आण्णासाहेब गुरव यांनी पुस्तकाविषयी मनोगत व्यक्त केले. डॉ. केदार मारुलकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास डॉ. डी. के. मोरे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. दीपा इंगवले आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : सुभाष संकपाळ यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार प्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह अन्य मान्यवर.

# सुभाष संकपाळ यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये अधीक्षक पदावर कार्यरत असलेले सुभाष संकपाळ निवृत्त झाले. सुरक्षा रक्षक ते अधीक्षक पदावर विद्यापीठातील सुरक्षा विभाग, भांडार, परीक्षा, संलग्नता, पी.जी.बीयू. टी.आर., दीक्षांत आणि प्रकाशने, जमा स्वीकृती विभागामध्ये असे ३८ वर्षे त्यांनी सेवा केली. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये आयोजित सेवानिवृत्त सत्कार समारंभामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, ग्रंथ भेट देऊन श्री. संकपाळ यांचा सपत्निक सत्कार झाला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद पवार, शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर, लेखा उपकुलसचिव रमेश लिधडे, संकपाळ कुटुंबीय, प्रशासकीय अधिकारी, सेवक उपस्थित होते.

0 5 JUL 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा 'डीकेटीइ'ला स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठाकडून डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँण्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूटला शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. या दर्जामुळे विद्यापीठ व महाविद्यालयाचे एकत्रित पदवी प्रदान करणे शक्य होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार मिळालेली ही शैक्षणिक स्वायत्तता विद्यार्थी हिताची ठरणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या अधिसुचनेनुसार उत्कृष्टताक्षम आणि उच्चस्तरीय



दर्जा प्राप्त केलेल्या विद्यापीठांशी संलग्नित डीकेटीई महाविद्यालयाला त्यांच्या स्वायतेच्या कालावधी इतका अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच, नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युतर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. विद्यापीठाच्या मंजुरीने डीकेटीईस पीएचडीचे अभ्यासक्रमही सुरु करण्याचे स्वातंत्र्य देखील मिळणार आहे. याआधीही डीकेटीईस एआयसीटीई दिल्ली यांनी तीनदा 'बेस्ट इंडस्ट्री - लिंकड् टेक्निकल इन्स्टिट्यूट सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले आहे. एनबीए मानांकनातही डीकेटीई अग्रेसर आहे. एनआयआरएफ इनोव्हेशन रँकिंगमध्ये देखील डीकेटीईचा समावेश केला आहे.

यासाठी संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, आमदार प्रकाश आवाडे, खजीनदार प्रकाश दत्तवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे व सर्व विश्वस्तांचे मार्गदर्शन मिळाले. इन्स्टिट्यूटच्या प्र. संचालिका प्रा. डॉ एल. एस. आडमुठे, डे. डायरेक्टर डॉ. यु. जे. पाटील, यांचा या यशात मोलाचा वाटा आहे.

पुढारी

# एम.फिल., प्री. पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा अर्ज भरण्यास ११ जुलैपर्यंत मुदत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाने मार्च-एप्रिल २०२३ सत्रातील एम. फिल., प्री. पीएच.डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालय, पदव्युतर अधिविभागात विनाविलंब शुल्क ११ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे.

महाविद्यालय, पदव्युतर अधिविभागात अतिविलंब शुल्कासह १८ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे. परीक्षा अर्ज ऑनलाईन अप्रुव्ह करण्याची मुदत दि. १२ ते १९ जुलै आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या २० जुलैपर्यंत सादर करावयाच्या आहेत. एम.फिल., प्री. पीएच.डी. कोर्स वर्क अभ्यासक्रमाची परीक्षा ७ ऑगस्ट रोजी होणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

सकाळ

# 'दूरशिक्षण'साठी करा ऑनलाईन अर्ज

**▸ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण अभ्यास केंद्राची यंदाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) मान्यताप्राप्त बी. ए., बी. कॉम., एम. ए. अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करायचे आहे. त्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत आहे.

एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), एम. कॉम., एम. एस्सी (गणित) या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया २२ जूनपासून सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करायचे आहेत.

ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रवेश घेतला आहे. अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील टी. सी. अर्ज मॅन्युअली पद्धतीने भरून तो अर्ज विद्यार्थी सुविधा केंद्राकडे सादर करावयाचा आहे. दरम्यान, एम. फिल., पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा प्रारंभ करण्याच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता परीक्षा ७ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. या परीक्षेसाठी विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत ११ जुलैपर्यंत आहे.

**विविध ३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर**

एम. ए., एम. बी. ए., एम. सी. ए. अशा विविध १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. त्यासाठी ८१३ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेत कॉपी करताना कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यात प्रत्येकी एक विद्यार्थी भरारी पथकाला सापडला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध ३३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले.

जनसंपर्क कक्ष
0 5 JUL 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'च्या ऑनलाईन अर्ज प्रक्रियेची ३१ जुलैपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बी.ए., बी.कॉम. एम. ए (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास) एम. कॉम. एम. एसी. (गणित) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार ३१ जुलैपर्यंत अर्जाची मुदत आहे. रजिस्ट्रेशनमधील माहिती अचूक भरून यूजर आयडी व पासवर्ड तयार करावा. रजिस्ट्रेशननंतर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. अर्जासोबत गुणपत्रकाची छायाप्रत, आधारकार्ड, स्थलांतर दाखला यासह आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

तरूण भारत

# दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्राचे प्रवेश अर्ज भरण्यास ३१ जुलैपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ३१ जुलैपर्यंत प्रवेश अर्ज भरावेत. विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करून प्रवेश अर्ज भरावयाचा आहे. प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरून प्रवेश घ्यावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी **http://www.unishivaji.ac.in/onlin_portal** या संकेतस्थळावर व **https://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/** या लिंकवरून परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तरी इच्छुकांनी दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे.

जनसंपर्क कक्ष

0 5 JUL 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ८१३ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेतंर्गत १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षेला ८१३ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी मास्टर ऑफ आटर्स, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ जर्नालिझम, बीएड., एम. एड., मास्टर ऑफ एज्युकेशन या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे झाल्या. आजअखेर सुमारे २४० हून अधिक अभ्यासक्रमांचे निकाल घोपित करण्यात आले आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर, सातारा जिल्ह्यात २ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.

0 5 JUL 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पृथ्वी कलंडतेय!



भोवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

शेतीसाठी जमिनीतील पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा करण्यात येतो. विशेषतः १९६० च्या दशकापासून अमेरिकेत मोठ्या प्रमाणात कूपनलिका खोदण्यास सुरुवात झाली. तरीही हे प्रमाण १९८० पर्यंत मर्यादित होते. १९९० नंतर तर पाण्याची गरज असेल तेथे कूपनलिका खोदण्यात येऊ लागल्या. भारतात, त्यातही महाराष्ट्रात १९७२ च्या दुष्काळापासून कूपनलिकांचे तंत्रज्ञान वापरण्यास सुरुवात झाली. या तंत्रज्ञानामुळे कमी खर्चात पाणी उपलब्ध करून घेता येते, हे लक्षात आल्यानंतर लोकांनी सर्वत्र कूपनलिका खोदल्या. हे प्रमाण इतके वाढले की, अर्ध्या एकरामध्ये तीन-तीन कूपनलिका खोदल्या गेल्या. यातून जमिनीतील पाण्याचा अमर्याद उपसा सुरू राहिला. या पाणी उपशाच्या दुष्परिणामाने आता पृथ्वीच्या अस्तित्वावर घाला घालायला सुरुवात केली आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका संशोधन निबंधात पृथ्वीचा अक्ष आपली जागा सोडत असल्याचे संशोधकांनी जाहीर केले आहे. पृथ्वीच्या या वागण्याची सांगड संशोधकांनी भारत आणि उत्तर अमेरिकेतील अमर्याद पाणी उपशाशी घातली आहे. याचा सध्या वातावरण आणि पर्यावरणावर परिणाम होणार नाही, असे संशोधकांचे मत आहे.

पर्यावरणाचा समतोल राखायचा तर जल, जंगल आणि जमीन यांचा समतोल ठेवला पाहिजे. मात्र, पृथ्वीवरील मानवी लोकसंख्या वाढू लागली आणि मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढला. जसजशी लोकसंख्या वाढली, तसा मानवी हस्तक्षेप वाढला. मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, पाणी आणि हवा. या तिन्ही गरजांची पूर्तता निसर्ग करतो. अन्न, पाणी आणि हवा उपलब्ध करून देण्यामध्ये वनस्पतींची भूमिका महत्त्वाची असते. वनस्पतींसाठी पाण्याची उपलब्धता आणि जमीन चांगली असावी लागते. त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी टिकून राहायची असेल तर या तीन गोष्टींचा समतोल राहायला हवा. मात्र, मानवाने आपले जीवन सुखकर बनवण्यासाठी या बाबींकडे दुर्लक्ष करून, हा समतोल मोठ्या प्रमाणात बिघडवला.

वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागवण्यासाठी शेतीसाठी झाडे तोडून जमीन उपलब्ध करून घेतली. शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी नद्यांवर बांध घातले. विहिरी बांधल्या. शेतीसाठी पाण्याचा अमर्याद उपसा सुरू केला. पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेसाठी विज्ञान, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कूपनलिकेचे तंत्रज्ञान विकसित झाले. सुरुवातीला कूपनलिकांना शंभर-दीडशे फुटांपर्यंत पाणी सहज लागत असे. पुढे पाण्याची पातळी खाली गेली. त्यामुळे कूपनलिकांची खोली आणखी वाढली. तरीही पाणी कमी पडू लागले. त्यामुळे आणखी खोल, आणखी खोल कूपनलिका खोदण्यात आल्या. कूपनलिकांची खोली वाढत, वाढत हजार फुटांपर्यंत कधी गेली हे कळलेच नाही. हजार फुटांच्यापुढे काही लोक कूपनलिका खोदू लागले. जमिनीतील पाण्याची पातळी आणखी खोल जात राहिली, कारण या कूपनलिकांतून जितके पाणी उपसले जाते तितके पाणी पुन्हा जमिनीत मुरत नाही.

जगाचा विचार केला तर वर्षभरात सरासरी ४१ इंच पाऊस पडतो. त्या तुलनेत भारतात जास्त म्हणजे सरासरी ४३ इंच पाऊस पडतो. महाराष्ट्रात त्याहीपेक्षा जास्त सरासरी ४८ इंच पाऊस पडतो. मात्र, महाराष्ट्रात जमिनीखाली बेसॉल्ट खडकाचा थर आहे. या कठीण थरातून पाणी खाली पाझरत नाही. त्यामुळे पर्जन्यमान जास्त असले, तरी जमिनीत पावसाचे पाणी पाझरण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. जर १०० लिटर पावसाचे पाणी उपलब्ध झाले, तर त्यातील ६७ लिटर पाणी नद्यांतून वाहत जाऊन समुद्राला मिळते. १७ लिटर पाण्याची वाफ होते. केवळ सहा लिटर पाणी तलावातून साठवले जाते, तर १० लिटर पाणी जमिनीत पाझरते. उपलब्ध पाण्यातील केवळ ११ टक्के पाणी नागरी वस्त्यांसाठी किंवा थेट मानवी वापरासाठी वापरण्यात येते. १९ टक्के पाणी उद्योग-व्यवसायासाठी वापरण्यात येते; तर ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरण्यात येते. शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्यातील जवळपास तीस टक्के पाणी हे नद्या आणि तलावातून उपलब्ध होते, तर सत्तर टक्के पाण्याची उपलब्धता ही विहिरी आणि कूपनलिकांमधून होते.

या कूपनलिकांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा होऊ लागला. त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेली. त्यामुळे दोनशे फूट खोलीपर्यंत कूपनलिका खोदण्याचा शासनाचा नियम असताना पाचशे, सहाशे फूट गाठत, हजाराच्यापुढे खोदल्या जाऊ लागल्या. चार-पाच वर्षांपूर्वी नांदेडमध्ये अशीच एक कूपनलिका खोदली जात होती. हजारपेक्षा जास्त खोल जाऊनही पाणी लागले नाही. मालकाने आणखी खोल जाण्याचा आग्रह धरला. अखेर त्या बोअरमधून उष्ण द्रवपदार्थ बाहेर पडला आणि त्यामध्ये कूपनलिका खोदणाऱ्या मशीनचे मोठे नुकसान झाले. तरीही माणसाचा हव्यास काही सुटला नाही. आजही खोल कूपनलिका खोदण्याचे प्रमाण काही कमी होत नाही.

दुसरीकडे चीन १०,००० मीटर खोल जमिनीत छिद्र खोदण्याचा प्रयत्न करत आहे. पृथ्वीच्या अंतर्गत रचनेचा अभ्यास करण्यासाठी हे ३०,००० फूट खोलीची कूपनलिका खोदत असल्याचे चीन सांगतो. अशा अनेक प्रयोगाच्या नावाखाली उपद्व्याप मानवाकडून सुरू आहेत. कूपनलिकांतून अधिकचा पाणी उपसा झाल्यामुळे भूजल पातळी खाली जाणे हा तत्काळ होणारा परिणाम. मात्र, भूजल पातळी खाली गेल्यामुळे खोलवर मुळ्या असणाऱ्या झाडांना जमिनीतून पाण्याचा पुरवठा होत नाही. त्यामुळे पिंपळ, कडूनिंब अशी झाडे सुकतात आणि अंतिमतः मरून जातात. हा दुसरा फटका. झाडे वाळल्यानंतर त्यांच्या मुळ्या मृत होतात. या मुळ्या जमिनीतून झाडाला जगवण्यासाठी जसे जमिनीतून पाणी घेतात, त्यापेक्षा जास्त प्रमाणात पाऊस पडताना पाणी जमिनीत नेण्याचे कार्य करतात. तेही थांबते. भूजल पुनर्भरण होत नाही, हा तिसरा दुष्परिणाम. याचा आणखी पुढे काही परिणाम होत असेल असे कोणाच्या मनातही येत नाही. कूपनलिकांच्या माध्यमातून शेकडो वर्षांपूर्वी जमिनीत जाऊन स्थिरावलेले पाणी मोठ्या प्रमाणात उपसल्याने आणि त्याचे पुनर्भरण न झाल्याने पृथ्वीवरील जीवसृष्टीला मोठा फटका बसू शकेल, असा शोध संशोधकांना लागला आहे.

मागील काही वर्षांत पृथ्वीचा अक्ष ८० सेंटीमीटर पूर्वेकडे सरकल्याचे संशोधकांच्या लक्षात आले आहे. यामागे भारत आणि उत्तर अमेरिकेतील भूजल पातळी खाली गेल्याचे कारण संशोधकांनी जाहीर केले. भारत आणि उत्तर अमेरिकेत मागील तीस वर्षांत २१८० गिगाटन पाणी उपसले गेले आहे. त्यामुळे दरवर्षी पृथ्वीचा अक्ष ४.३६ सेंटीमीटरने १९९३ ते २०१० या काळात सरकला आहे. यामुळे हवामानाचे अंदाज बदलू शकतात. जेवढे जमिनीतून पाणी उपसले, ते जर समुद्रात पसरले तर समुद्राची पातळी ०.२४ इंचाने वाढेल. त्याचा अनेक गावांना फटका बसू शकतो. आपण निसर्गात कसलाही हस्तक्षेप करताना त्याचा पुन्हा पुन्हा विचार करायला हवा. पण, हा हव्यास थांबत नसल्याने पृथ्वी कलंडतेय, तिचा तोल जातोय!'

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००